

श्री पूर्ण परब्रह्म कलंकी अवतार ईश्वर वैजनाथ भगवान

जन्म-१९१६ – महानिर्वाण १९८७

।।आत्मा वा अरे द्रष्टव्या।।

"आत्मानुभव हेच जीवनाचे सर्वश्रेष्ठ धेय"

श्री पूर्ण परब्रह्म कलंकी अवतार ईश्वर वैजनाथ भगवान

कृत

शुध्द अंतस्फूर्तीतून स्फूरलेली सिध्दांत बोधवचने

# परमस्थिती गीता

॥ दत्त कलंकी अध्यात्म मिशन ॥

श्री कलंकी देव संस्थान, संगमनेर ,
रजि.न.ई ८६१, नगर रोड , ज्ञानमाता विद्यालयसमोर,
मु.पो.ता. संगमनेर, जि. अहमदनगर.
संपर्क: ९८९०९०५५४६, ९७०२९६००९६



# : प्रस्तावना :

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेंन् स्वयंम्
व्यासेन ग्रंथिताम् पुराण मुनिना मध्ये महाभारतम् ।।
अद्वैतांमृत वर्षिणी भगवती मष्टा दशा ध्यायिनी ।।
मबत्त्वां मनु संदधामि भगवत् गीते भवद्वेषिणीम् ।।
(गीता महात्म्य)

अर्जुनाला निमित्तमात्र करून सांगितलेल्या श्रीमद् भगवद्गीतेचे महात्म्य काही औरच आहे. पुराण महर्षि व्यासमुनी यांनी महाभारतात अंतर्भूत केलेले हे नवनीत आहे. हा अद्वितीय ग्रंथ अद्वैतरुपे अमृताचा वर्षाव करणारा व भयसागरातून पैलतिरी पोहचविणारा आहे. याच्या वाचनाने, मननाने व चिंतनाने कुणाचेही कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. अशी ही गीतेची थोरवी काही आगळीच आहे.

गीतेचा जन्म विश्वारंभी ओंकारापासून झाला. भूमंडळावर अवतार धरून परमेश्वर वेळेप्रमाणे गिता सांगू लागला. भगवद्गीता ही परमेश्वराचे आत्मनिवेदन व विश्वरूपदर्शन आहे. कुणाचे तरी निमित्त करून परमेश्वर आपली गिता वर्णन करीत असतो. चालू युग चौकडीत परमेश्वराचे दहा अवतार झाले. चार मायावी स्वरूप धारण करून तात्पुरते झाले व सहा मानवात अयोनी संभव मायावी स्वरूपाने प्रगट झाले. वेळेप्रमाणे गिता मार्गदर्शन परमेश्वराला प्रत्येक अवतारात करावे लागले. मानवाचे मन अधोगतीला जाऊन पोहचल्यानंतर परमेश्वराला साकार व्हावे लागते. प्रत्येक अवतारातले कार्य सज्ञनांचे व भक्तांचे रक्षण असुरांचे निर्दालन, पतिव्रता धर्माचे मार्गदर्शन व सद्धर्म स्थापना हे होय.

गीता हे परमेश्वराचे विश्वरुप विराट दर्शनच आहे. हे युगायुगात वेळेप्रमाणे परमेश्वराने अवतार धरल्यानंतर प्रगट होत असते. गितेत परमेश्वराचे आत्मनिवेदन होते व विश्वरूप दर्शन घडते. विश्व हे परमेश्वराचे विराट स्वरुप आहे. निर्गुण निराकारातुन भानाठायी स्पंद स्फुरुन ॐ हे मुळाक्षर जन्माला आले तेच ॐकार विराट स्वरुप बनले. साडेतीन मात्रा त्याचा विस्तार झाला, मध्यबिंदूस्थान ब्रह्म आहे व अर्धमात्रा माया बनली. अकार ब्रह्म उकार विष्णू मकार महेश अशा सत्त्व, रज, तम ह्या त्रिगुण तत्वाने परमात्मा विश्वाचा कारभार पहातो. विश्व विस्तार हा अनंत कोटी ब्रह्मांडाचा आहे. ब्रह्मांडाप्रमाणे सुत्रधारी नेमून परमेश्वर विश्वाचा कारभार पहातो. ब्रह्मकल्पांत विश्वभास लयाला जाऊन पंचमहाभुते एकमेकाला गिळून शून्याकार स्थिती होते व ब्रह्म परब्रह्म निश्चल स्वरुप उरते. परमेश्वरासभोवती सिद्ध मुक्तात्मे जाणीव स्वरुपात असतात. भानाठायी स्पंद स्फुरल्यानंतर ब्रह्म जागृत होऊन पुन्हा विश्व भासमान होऊन कारभार चालू होतो. असे कलंकी देव म्हणतात. असे हे विराट स्वरुप बिंश्वरुप दर्शन कृष्ण परमात्म्याने अर्जुनाला गीतेने आत्मनिवेदनाने घडविले.

गीता म्हणजे परमेश्वराची आत्मप्रचिती होय. त्यात वेळेप्रमाणे मानवांना कर्तव्य मार्गदर्शन व सत्यसदाचर सांगितला जातो. गितेचे रुपक युगायुगात बदलत रहाते. फक्त अध्यात्म बदलत नाही. अधर्म अराजकावेळी परमेश्वराने अवतार धरल्यानंतर वेळेप्रमाणे गिता मार्गदर्शन होत असते. परमेश्वर ही गीता ग्रंथित करून भक्तजनांना विश्वरूप दर्शन घडवितो. त्यामुळे परमेश्वराचे विराट स्वरुप भक्तजनांना कळते. कृष्णावतारात अर्जुनाच्या निमिते गीता सांगितली गेली. नवव्या बौद्धरुपी ज्ञानेश्वर अवतारात ज्ञानेश्वरीच्या रुपाने पुन्हा गिता मार्गदर्शन केले व ह्या घोर कलियुगात परमेश्वराचा शेवटचा १० वा कलंकी अवतार वैजनाथरुपे अयोनी संभव झाला आहे. ह्या अवतारात परमस्थिती गीतेच्या द्वारे अखिल मानवजातीला उद्देशून हे गीतांमृत ग्रंथित केले आहे. हा ग्रंथ एकूण ७७७७ सिद्धांत वचनांचा आहे. त्यापैकी २४७७ सिद्धांत वचने (क्रमांक ५३०१ ते क्रमांक ७७७७) ह्यामध्ये श्रीकृष्णार्जुन संवाद आला

आहे. ह्या संवादात मानवी जीवनातील अनेक शंका कुशंकांची उकल करण्यात आली आहे. वाचकांना ह्या भव्य महासागरातले थोडे तरी तीर्थ मिळावे. म्हणून २४७७ पैकी ११५५ सिद्धांत वचने आम्ही कलंकी परमस्थिती गिता भाग १ ह्या ग्रंथ पुस्तीकेत प्रकाशित केले होते. आता संपूर्ण गीता प्रकाशित करत अहोत.

परमेश्वराचा अवतार जर आला नसता तर आपणा मानवांना गिता कोठून बरे कळाली असती? कृष्णावतारात काळ हा कितीतरी हजारो वर्षापूर्वीचा व तसेच ज्ञानेश्वर अवताराचा काळ हा ही सुमारे ८०० वर्षापूर्वीचा. त्यामुळे तथाकथित सध्या प्रचलित असलेल्या गीतेत किती तरी बदल झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात त्यावेळेस श्रीकृष्ण परमात्म्याने अर्जुनाला काय सांगितले हे त्याच्याशिवाय कोण बरे खरे सांगू शकणार? त्यामुळे परब्रह्माचा अवतार आल्याशिवाय असे निरूपण होणे कठीणच ! विद्वान लोक शाब्दिक पांडीत्याने व विद्वत्तेने फक्त गीतेची इतर भाषेत भाषांतरे अगर विवेचन करू शकतील, परंतु मूळ गिता काय सांगितली गेली याचा अंत त्यांना कसा काय बरे लागू शकेल? त्यासाठी परमेश्वरी अबतारच यायला हवा. परमेश्वरी अवतार हा अधर्म अराजकावेळीच साकार होतो. चालू युग चौकडीत परमेश्वराने अंबऋषिसाठी दशावतार घेण्याचे ठरविले. त्यापैकी कच्छ, मत्स्य, वराह, नरसिंह हे चार मायावी स्वरुपे धारण करून तात्पुरते येऊन गेले व सहा मानवात वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्धावतार-ज्ञानेश्वर व दहावा शेवटचा कलंकी अवतार वैजनाथ नामे ह्या घोर कलियुगात प्रगट झाला आहे. ह्या कलंकी अवतारात संपूर्ण ब्रह्मसुत्र वर्णन प्रगट केले आहे. त्यात २०-२५ ग्रंथ, लाखो अभंगावली वगैरे सर्व प्रकारचे गद्यमय, पद्यमय लिखाण प्रकट केले आहे. त्यापैकीच परमस्थिती गिता हा एक अभूतपूर्व ग्रंथ आहे. त्यात श्रीकृष्णार्जुन संवाद सुध्दा ह्या ग्रंथ पुस्तिकेत्त आहे. त्यातील रसाळता, नैसर्गिकता, सुलभता, स्पष्टवक्ता, उद्‌बोधकता वाचकांच्या ध्यानात येईलच. सत्य सदाचार व ब्रह्मसनातन हाच खरा धर्म होय. त्याचे प्रितपादन कलंकी देवांच्या सर्वांगीण लिखाणातून आले आहेच. कालांतराने त्याचा संपूर्ण जगभर प्रसार होऊन विश्वातील सर्व मानव एक तत्त्वावर येऊन बंधुभाव प्रेम सौख्यभरे नांदतीलच अशा ह्या अगाध लिखाणाच्या प्रसार कार्यासाठी आपणासारख्या सज्जनांच्या तन मन धन रूपे सहाय्याची नितांत आवश्यकता आहे. ते सहाय्य आपण दिले तरच आम्हा भक्तमंडळाला पुढील प्रकाशन करता येणे लवकर शक्य होईल.

कलंकी देव संस्थानाचे तेरावे प्रकाशन आपणा हाती देताना आम्हास अत्यानंद होत आहे. आपल्या सहाय्यामुळे व मुद्रक संजय ऑफसेट यांच्या सहाय्यामुळेच आम्हाला हे प्रकाशन इतक्या लवकर आपणा हाती देता आले. आपणा सर्व दानशूर भक्तजनांचे हार्दिक आभार ! तसेच आपण पुढेही असेच सहाय्य देऊन ह्या विश्वधर्माच्या कार्यास हातभार लावाल हीच अपेक्षा !

आपणा सर्वांना हा अद्‌भूत ग्रंथ आत्मप्रेरक, उद्‌बोधक, जीवनदायी व आत्मकल्याणी ठरो व ह्या ज्ञानसागरात आपण येथेच्छ डुंबत रहाल अशी दत्तचरणी सदिच्छा व्यक्त करून ही ग्रंथ पुस्तिका आपल्या हाती देत आहोत.

**जय जय दत्तराज माऊली ।**

**जय जय वैजनाथ माऊली ।**

आपले नम्र

**श्री कलंकी देव संस्थान,**

संगमनेर, रजि. नं. ई ८६१

।। श्री पूर्ण परब्रह्म ।।

# कलंकी अवतार ईश्वर वैजनाथ भगवान यांचा अल्प परिचय

विश्वव्यापी बंधू-भगिनींनो ! आम्हाला कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, संत-साधू जनांच्या रक्षणासाठी, असुरी वृत्तीच्या दुष्ट मनोवृत्ती नष्ट करण्यासाठी, सद्धर्म रक्षणासाठी, सत् प्रवृत्तीचा उगम होण्यासाठी, युगायुगात परमेश्वराने कच्छ, मच्छ, रामकृष्णादि अवतार घेतले. त्यात ह्या घोर कलीयुगात महासती अनुसया अत्री यांचे पोटी अयोनी संभव परम पुजनीय , पूर्ण परब्रह्म कलंकी अवतार वैजनाथ नामे श्रावण शुध्द १ प्रतिपदा सोमवार सूर्योदयावेळी सन १९१६ रोजी महाराष्ट्रात नगर जिल्हा संगमनेर शहरात, साळीवाडा भागात गणपतसिंह सरदारसिंह परदेशी यांच्या वाड्यात, भूमंडळावर सगुण साकार झाले.

श्री परम पुजनीय कलंकी देवाचे बालपण पंचवटी नाशिक येथे गेले. नंतर सन १९३१ साली पुण्यात वास्तव्य झाले. बराचसा काळ कलंकी देव देहभान स्थितीत नव्हते. पुढे सन १९३६ साली त्रैलोक्याधिपती ब्रह्मवेत्ते त्रैमुर्ती दत्त भगवान यांनी पुण्यात शुक्रवार पेठ गाडीखाना येथे मानवी स्वरुपात येऊन विजयादशमी (दसरा) या दिवशी अनुग्रह देऊन चिरंजीव हो ! म्हणून आशीर्वाद दिला. नंतर वृध्द माता, पिता, चुलता चुलतीसह श्री कलंकी वैजनाथ देव तिर्थ यात्रेस बाहेर पडले. वाई, सातारा इ. महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी फिरून सन १९४९ साली कलंकी देव संगमनेरला परत आले.

श्री कलंकी भगवंताच्या बाह्मी स्थितीतून अद्वितीय, अफाट आणि अमोलिक असे हस्तलिखित ज्ञानभांडार बाहेर पडले. त्यात सतरा अठरा लहान मोठे ग्रंथ, लाखो अभंग, पदे, दोहरे, श्लोक इत्यादी सर्व प्रकारचे सामाजिक, अध्यात्मिक, भक्तिपर, चालु परिस्थितीवर आधारीत असे हे हस्तलिखित ज्ञान भांडार आहे. भक्तगण या दिव्य ज्ञानामृतांचा लाभ घेत असतात. परमार्थात मुरलेल्या ज्ञानी, समंजसानी व इत्यादींनी या दिव्य ज्ञानाचा लाभ घेऊन कृतार्थ होऊन जावे आणि अवतार कार्याचे मर्म जाणावे.

सन १९६३ साली श्री कलंकी देवांची कुंडलिनी जागृत होऊन तिची पूर्णता सन १९६४ साली झाली. ज्ञानात्मा बौद्ध अवतार ज्ञानेश्वरी माऊलीने त्या काळातील संस्कृत भाषेतील ज्ञान प्राकृतात निर्माण करून भागवत धर्माची स्थापना केली. सर्व संतांना सांगितले की, त्यांचे भागवत धर्म कार्य पुढे मी कलंकी वैजनाथ रुपाने चालू राहील. विश्वधर्माची स्थापना होईल व धर्माचे मुळ जे समता, स्वातंत्र्य, बंधुभाव निर्माण होऊन भूतदया वाढेल. आजपर्यंत ईश्वराचे नऊ अवतार झाले. श्री पूर्ण परब्रह्म कलंकी अवतार ईश्वर वैजनाथ भगवान, हे दहावा अवतार होत. त्यांचे महानिर्वाण आषाढ शु।। १०, सोमवार दिनांक ६ जुलै १९८७ साली संगमनेर येथे झाले.

**टिप :** कलंकी देवांचे वायुरुप स्थितीने साक्षात्कार लिला घटना घडत राहतीलच. सवे गोरक्ष, हनुमंत, दत्त हे राहतील. भक्तजनांना त्यांचे दृष्टांत, साक्षात्कार होत असतातच.

आपले

**श्री कलंकी देव संस्थान**

मु.पो.ता. संगमनेर, जि. अहमदनगर

॥ ॐ ॥

# मी ईश्वर आहे कसा ?

॥ श्री सद्‌गुरु दुर्वास दत्त प्रसन्न ॥

॥ श्री पूर्ण परब्रह्म कलंकी अवतार ईश्वर वैजनाथ भगवान ॥

## -: श्लोक :-

॥ असे जानता भासुनी हा अकर्ता । असे तोचि कर्ता नि स्मर्ता विवर्ता ॥
॥ मना कलंकी बने गा तोचि हर्ता । नुरे कल्पना शोधिता मुळ वार्ता ॥

## - यांचे स्वकथन -

मी ईश्वर कसा आहे ? तर, निर्गुण, निराकार, गुणातीत, मायातीत, स्मरणातीत, स्फुरणातीत, नामरुप नाही, परंतु आहे नाही अशा स्थितीत आहे. ब्रह्मकल्पांत महानिद्रा लागून मी स्मरणातीत झालेलो असतो. मी कसा जन्माला आलो, हे माझे मलाच समजत नाही. मला गांव नाही, शिव नाही, काही नाही. अजन्माचा जन्म, भासमान भानाठायी स्पंद स्फुरुन झाला. त्यात अ, ऊ ओम ॐ हा उच्चार होऊन साडेतीन मात्रा प्रगट झाल्या. अकार, ऊकार, मकार मी विश्वरुप झालो. अर्धमात्रा ही माझी शिव आहे आणि मध्यबिंदुस्थान मी ब्रह्म आहे तोच आहे. भानाठायी स्पंद स्फुरन चिच्छक्ति निर्माण झाली. चिच्छक्ति पासून त्रिगुण, त्रिगुणाने पंचमहाभूते जन्माला येऊन मी नामरुप बनलो. प्रथम मी भक्त बनलो व मी कोण हे कळण्याकरिता निर्गुणाचे सगुण ब्रह्म बनले. तोच मुर्तरुप अंतस्फुर्ती म्हणजे कर्तुमाकर्तुमशक्तिची प्रत्यक्षता होय हा विसर पडल्यानंतरच मी युगायुगात साकार होतो. मोक्षदाता सद्‌गुरु माझी ओळख करून देतो. माझे विराट स्वरुप हे विश्वरुप दर्शन होय. विश्वात अनंत कोटी ब्रह्मांडे आहेत. विश्वाचा भाग आदि मध्य अंत, स्वर्ग, भूमंडळ, पाताळ हे होय. त्याला त्रिभुवन म्हणतात. भूमंडळावर मी मानवांची मनाची अधोगती वाढल्यानंतर नामरुपाला येतो व संतमालिका निर्माण करून माझी ओळख करून देतो. युगप्रलय अधर्मात होतो. सृष्टीप्रलय युग चौकडीनंतर होतो. युगप्रलयात असंख्य जिवांचा संहार होऊन मानव आपल्या पदावर संत अवतार मालिकेने येतो. सृष्टीप्रलयात सृष्टी नाश पावते. सृष्टीप्रलय दोन प्रकारचा, एक चंद्राची षोडशावी कला निर्माण होऊन चंद्र नाहीसा होऊन भयंकर शितलता निर्माण होऊन सप्तसागर गोठणे, त्यात सर्व योनी लयाला जाणे. दुसरा सूर्य बारा कळी तापून, समुद्राचे पाणी आटून, काळे ढग निर्माण होणे, पर्वताच्या लाह्या बनणे, काळे ढग बनल्यानंतर हत्ती सोंड पर्जन्यधारेने सृष्टी जलमय होणे हे होय. तद्‌नंतर ईशईच्छेने पुन्हा नवीन सृष्टी रचना होणे. त्याचप्रमाणे ब्रह्माला प्रलय होणे म्हणजे विश्व पंचमहाभूते नष्ट होऊन शून्याकार स्थिती बनणे. त्यात दानव, मानव, देव, लक्ष चौऱ्यांशी योनी सर्व लयाला जातात. फक्त शून्याकार स्थितीत ब्रह्म मी एकला उरतो. माझ्या सभोवती सद्‌गुरु कृपा झालेले मुक्तात्मे अमर जागृत स्थितीत राहातात. भानाठायी स्पंद स्फुरल्यानंतर विश्वस्थिती निर्माण होऊन पुन्हा घडामोडी चालू होतात. चालू विश्वात भूमंडळावर मी युगायुगात अधर्म अराजकावेळी मुर्तरुप अंतस्फूर्ती अवतार बनतो व संतमालिका निर्माण करून आपली ओळख देतो. कोण्या युगाची किती संवत्सरे हे मानवांना ठरविता येत नाही. त्याचप्रमाणे कोणती युगे चौकडी किती संवत्सराची असते हे मानवांना ठरविण्याचा अधिकार नाही. ही ईश्वरी ईच्छेने ठरली जाते. युगे, महायुगे, मन्वंतरे, सृष्टीप्रलय, ब्रह्मप्रलय ईश्वरी मानसशक्तीच्या घडामोडी आहेत. युगायुगात अवतार धरल्यानंतर अवताराने परब्रह्म स्वरुपाची ओळख व ब्रह्मनिरुपण होते. चालु युग चौकडीत सृष्टीत दहा अवतार झाले. मत्स्य, कुर्म, वराह, नरसिंह चार मायावी स्वरुपाने व सहा वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्धरुपे ज्ञानेश्वर आणि दहावा शेवटचा वैजनाथ रुपाने मी कलंकी अवतार झालो, भारत संस्कृतीसाठी ! त्रैमूर्ति दत्ताने इच्छा केली, मी नामरुप धारण केले व ब्रह्मनिरुपण कथन केले. भक्तीप्रेमाने, सत्संगाने माझी ओळख भक्तांना होऊ शकते. भारत संस्कृती अध्यात्माने सर्व जगात श्रेष्ठ आहे. ती राखण्याकरिता युगायुगात मला यावे लागते, असे कलंकी देव म्हणतात.

**श्री. पू. प. क.अ.ई. वैजनाथ भगवान**

# उपोद्घात

मानवांना ज्ञान देणे व मजकडे ओढून घेणे हे माझे ईश्वराचे कर्तव्यच आहे. यासाठी म्या वैजनाथरूपे आता कलंकी अवतार धरलेला आहे व वेळेप्रमाणे परमस्थिती गीता नावाचा ग्रंथ मूढ जनांसाठी, प्रगत करीत आहे. परमस्थिती म्हणजे माझी परमआत्म्याची मुळ स्वरुपाची ओळख होय. ग्रंथ श्रवण पठण करणारांनी गरिब देवाच्या चुकल्या मुकलेल्या शब्दांना मान्य करून घ्यावे व सांभाळून घ्यावे. मी ईश्वरसुध्दा तुमच्यातला आहे व तुमच्यासारखे बनल्याशिवाय मी जगाला कसा कळणार? म्हणून मला युगायुगी तुम्हांसाठी अवतार धरावा लागतो. ज्याप्रमाणे लहान मुलांना अक्षर ओळख करून देणारे शिक्षक गुरूजी असतात त्याचप्रमाणे ईश्वरी अवताराला जागृत करणारे मोक्षदाते सद्गुरु असतात. ह्या कलंकी अवतारात मला सद्गुरु दुर्वास दत्त आहेत. सद्गुरुने मी परमात्मा आता आकाराला आलो. जगाला नीट वळण लागण्याकरिता मी ईश्वर सद्गुरु करून घेतो व घेत असतो. परमस्थिती गिता ही वेळेप्रमाणे मार्गदर्शक आहे. सुईच्या अग्राएवढीही जमीन मी पांडवांना देणार नाही. दुर्योधनाचे हे निर्वाणीचे बोल ऐकून मी श्रीकृष्ण परमात्म्याने तो निरोप पांडवांपर्यंत पोहचविला. युद्ध टाळून तडजोड घडवून आणण्यासाठी म्या परमात्म्याने पुष्कळ प्रयत्न करून पाहिला. परंतु कौरवांच्या स्वार्थी व अहंकारी वृत्तीमुळे त्याचा काही एक उपयोग झाला नाही. शेवटी युद्ध अटळ होते. कौरवांच्या व पांडवांच्या सैन्याची जमवाजमव झाली. मी माझे सर्व सैन्य कौरवांना देऊन टाकले व माझा परमभक्त अर्जुन याच्या रथाचे सारथ्य करण्याचे काम पत्करले. कौरवांच्या बाजुने भिष्माचार्य, द्रोणाचार्य, कृपाचार्य, कर्ण आदी अथि-महारथी होते. त्यामुळे आपलाच विजय होणार ह्या भ्रमात कौरव होते. त्याकाळचे युद्ध म्हणजे धर्मयुद्ध होते. लढाईला सूर्योदयानंतर सुरुवात होत असे व सूर्यास्ताच्या वेळी पुन्हा लढाई बंद करून दोन्ही बाजूचे योद्धे आपापल्या छावणीत परतत असत.

धर्मयुद्धाला सुरुवात होण्याचा दिवस ठरला गेला. कौरव व पांडवाकडील दोघांनीही आपल्या सैन्याची योग्य ती रचना कुरुक्षेत्रावर केली, अर्जुनाच्या रथाचे सारथ्य मी कृष्ण परमात्माच करत होतो. अर्जुनाच्या सांगण्याप्रमाणे मी रथ दोन्ही सैन्याच्या मध्यभागी नेऊन उभा केला. युद्धाला कोण कोण सज्ञ झालेले आहे म्हणून रथातून कौरवाकडील सैन्यांची पाहणी अर्जुन करू लागला. द्रोणाचार्य, कृपाचार्य, भीष्माचार्य आदि आपले गुरुवर्य काका, मामा, भाऊ इ. नातलग आपल्यासमोर युद्धाला ठाकले आहेत. त्या सर्वांना मारून मी हे राज्य मिळवून करणार तरी काय? ज्या गुरुंनी, काका, मामांनी मला शिकवलं, त्यांच्यावर शस्त्र उगारून हे धर्मशास्त्राला अनुसरून कसे काय होईल बरे? ह्या सर्वांना मारण्याचे पातक माझ्या शिरावर घेऊन त्रिभुवनाचे राज्य जरी मिळाले तरी त्याचा काय बरे उपयोग ? माझा धर्म असं करावं असा मला मुळीच शिकवत नाही. अर्जुनाची वीरस्त्री एकदम थंडावली. बाहू गलितगात्र झाले. हातातले शस्त्र खाली आले व चिंतामग्न होऊन अर्जुन पटकन आपल्या रथाच्या खाली उतरला व हे श्रीकृष्णा मला युद्ध करावयाचे नाही असे मला परमात्म्याला बोलू लागला. वैराग्यपूर्वक भाषण करून नितीमत्तेची व धर्माची लक्षणे सांगून मला परमात्म्याला नानाविध शंका विचारू लागला. मी श्रीकृष्ण परमात्मा म्हणालो बा अर्जुना ! अरे यांना तू मारणारा कोण आहेस बरे? कर्ता करविता हर्ता सर्व काही मीच आहे. माझ्या सत्तेविण ह्या सृष्टीचे पानही हालत नाही. अरे अर्जुना ! यांचा पापाचा

घडा पूर्ण भरल्यामुळे हे तू मारण्या अगोदरच मेलेलेच आहे. मग यांना तू मारणारा कोण बरे! सांग पाहू. तुझ्या क्षत्रियाच्या क्षात्रधर्माचे पालन तुला करावयालाच हवे. तू फक्त निमित्तासी कारण आहे. सर्व काही मीच करणार आहे. मग तुला पातक कसे लागेल ते सांग बघू ? तुझ्या रथाच्या ध्वजस्तंभावर मारुतीराया गुप्तरुपाने वास करून भु:भुकार करतील व त्यामुळे कित्येक कौरव सैन्याचे निर्दाळण होईल. बा अर्जुना तू जर तुझा क्षात्र धर्म पाळला नाहीतर इतिहासात तुझी नेभळट व भित्रा म्हणून गणना होईल. अरे जे कौरव तुमचे भाऊ असून तुम्हास १२ वर्षे वनवास व १ वर्ष अज्ञातवासात पाठवितात व तुमच्या हिश्यातील राज्य तुम्हास न देता सुईच्या अग्राएवढीही जागा न देण्याची भाषा करतात त्या कौरवांशी युद्ध करणे काय गैर आहे ते तूच सांग बरे ? बा अर्जुना ! तुम्ही पांडवांनी माझा परमात्म्याचा अवतार ओळखला आहे. पण कौरवांना मी जवळ असूनही ते मला मनुष्य रुपातच लेखतात व मनुष्यच समजतात. त्यामुळे तुम्ही जाणले म्हणून तुम्हा पांडवांचा उद्धार आहे व कौरवांनी जाणले नाही म्हणून त्यांना मरण हे ठरलेलेच आहे. अशी नानाविध प्रकारे मी अर्जुनाची समजूत काढली व त्याच्या क्षात्रधर्माचे कर्तव्य करण्याची त्याला जाणीव करून दिली. त्यावेळी अर्जुन अगदी तन्मय झाला होता. माझ्या विराट स्वरुपाचे वर्णन केले तेव्हा त्यातच त्याला विश्वरुप दर्शन घडले असा ज्ञानी झालेला माझा भक्त अर्जुन मग आपल्या कर्तव्यास ज्ञानपूर्वक तयार झाला व नंतर सर्व कौरवांचे पुत्र पौत्रासहीत निर्दाळण झाले. त्यावेळी मला अर्जुनाने ज्या नानाविधी शंका विचारल्या त्याची सर्व उत्तरे मी त्यावेळी अर्जुनास दिली होती. तेच पुढील सिद्धांतवचनात मी गद्यमय मराठी प्राकृत मध्ये करीत आहे. त्याकाळी संस्कृत हीच बोलाचालीची भाषा होती, त्यामुळे मी गिता संस्कृत भाषात सांगितली व महामुनी व्यासांनी आपल्या अंतस्फुर्तीने तिचे श्लोकमय संस्कृतमध्ये निवेदन केले. परंतु हजारो वर्षापूर्वी सांगितलेल्या त्या गितेत कालमानानुसार हस्ते परहस्ते काही बदल झाला व त्यामुळे काही सत्यज्ञान लोपले व त्यात काही दुसरी भर पडली. वेळेप्रमाणे माझ्या परमात्म्याच्या गीतेत थोडा बदल असतोच. गिता म्हणजे हे परब्रह्म स्वरुपाचे दिग्दर्शन होय. ते मी केवळ अर्जुनासाठी नाही तर अखिल मानवजातीसाठीच करून ठेवले आहे. माझ्या शेवटच्या कलंकी अवतारात आता हे वेळेप्रमाणे मी हे परमस्थिती गितेच्या रुपाने प्रगट करीत आहे. तुम्ही सर्व मानवांनी त्याचा लाभ घ्यावा व तुमचा आत्मोद्धार व्हावा म्हणूनच मी अवतार धरत असतो. कलंकी रुपे आता माझी ही शेवटचीच सगुण भेट आहे. माझा झालेला श्रीकृष्णार्जुन संवाद आता मी तुम्हा पुढे मांडत आहे. व या कालमानानुसार तुम्हास मार्गदर्शक असे परमस्थितीचे ज्ञान प्रगट करीत आहे.

– श्री कलंकी देव

# श्री संत कलंकिनी बेबीनाथमाया यांचे – मनोगत

## (श्री कलंकी देव सद्गुरू भेट व आत्मानुभवाचे अल्पबोल)

श्री गणेशाय नम: श्री गुरुब्रह्माय नम: श्री गुरूदेव दत्त, वैजनाथ रामकृष्ण, ॐ सोहं परब्रह्माय नम:

गुरू बंधू भगिनीनो ! तसेच जग जनार्धन हो !

मी एक पामर भक्त आहे. श्री कलंकी देवांचा मला पामरीला वरदकर असून कृपाप्रसाद वाणी आहे. मी बालपणा पासून शिवभक्त होते वयाच्या सहाव्या वर्षापासून मी भगवान शिवाची निष्ठेने व प्रेम प्रितीने भक्ती करत होते. तरी त्यात माझा मायिक स्वार्थ होताच; कारण मी लहान असतांना माझी माता भोळी अज्ञान अह्नय होती. तिला मूल झाले की ते वर्षातच मृत्युमुखी पडत असे. ते दु:ख मला पहावत नसे म्हणून मी बाल वयातच शिव भक्ती करू लागले. आढळा नदीच्या कडेला जवळे येथे आढळेश्वराचे शिवमंदिर आहे. तेथे मी पूजा प्रार्थना करत असे. तरीही ते माझ्या अज्ञान बाल अवस्थेला प्रतिसाद देत होते. तेव्हापासून देव मला बाळकृष्ण रूपात भेटत व माझ्या मनाची घालमेल ओळखून मला चांगले म्हणजे समाधान कारक संकेत देत असत. अशी भोळी भक्ती करुन मी मोठी झाले. वयात आल्यानंतर इतरांप्रमाणे लग्न झाले खरे, परंतु माझे चित्त संसारात रमत नव्हते. त्यात मला दु:खाचेच अनुभव येत असत. याप्रमाणे चौदा वर्ष दु:ख यातनेतच गेले. नंतर मी जालंदर नाथाची उपासना केली. त्यांनी भगवान शिव अधिष्ठानाने मला प्रचिती दिली ती उपासना करता करताच माझे गाणगापूर येथे जाणे येणे होऊ लागले. तेथे दत्तांनी मला कृपाशिर्वाद देऊन मी तुझा गुरु होईल असे सांगीतले.

श्री दत्तांच्या भेटीची मी वाटच पहात होते ते कुठल्या स्वरुपात आहे व कोठे आहे हे मला माहित नव्हते. एक दिवस श्री कलंकी देवांचे अल्प चरित्र मला एका सद्भक्ताने वाचण्यास दिले. त्यात कलंकी देवांचे संगमनेर येथील वास्तव्य कळले व त्यातला फोटो जणूकाय माझ्याशी हासतो व बोलतो अशी जाणीव होऊन भेटीची तीव्र ओढ लागली. लगचेच दुसऱ्या दिवशी मी ज्ञानमाता विद्यालयासमोर संगमनेर येथील कलंकी देवांच्या आश्रमात गेले. त्यावेळी कलंकी देव झोपलेले होते व मी त्या आश्रमात भिंतीस पाठ टेकून बसले होते. काही क्षणात कलंकी देव उठले व मला पाहून हास्य वदनाने बोलले जणूकाय आमची अनेक काळापासून ओळख आहे अशारितीने ते म्हणाले ''आलीस का सर्व जगाला भोवरा देऊन, मला मायेत टाकायला भवाने! तुला दत्तांनी पाठवले काय? '' ते असे म्हणताच माझे ह्रदय दाटून आले व मी महाराज म्हणून रडू लागले. तितक्यात त्यांनी जवळ ये बाळ म्हणून माऊलीप्रमाणे हाक दिली. मी जवळ जाताच कुठलाही विचार न करता मला अनुग्रहीत केले व शक्तिपात केला. नंतर माझे भान हरपून वेगळीच अनुभूति आली. त्याचे विवेचन केल्यास हा शब्दप्रपंच वाढेल म्हणून त्याला येथेच पूर्णविराम देऊन पुढे आत्म्याविषयी स्वानुभवात्मक अल्पबोल विशद करीत आहे.

सज्जनांनो व भक्तगण हो! आत्मा सिद्ध आहे हे प्रचितीने कळू लागते. स्वानुभव हाच खरा सिद्धांत आहे. आत्मा स्वयंसिद्ध व प्रकाशरुप आहे. तेथे अंधकार नाही. त्याची जाणिव भानाठाई शुद्ध स्पंद उमटू लागले की अंधकार नष्ट होऊन शुध्द प्रकाश अंतरंगी चकाकू लागतो. तेथेच मीचा प्रश्न सुटतो व मी देह नाही हे स्वयंभू तत्वाने कळू लागते. कारण देह जर मी असतो तर स्वईच्छेने जन्म मृत्यू चुकवू शकलो असतो. तर देह दास आहे व तो स्वावलंबी नसून आत्मतत्वांच्या स्वाधिन आहे. आत्मा हा प्रबल बलशाली आहे. त्याच्या ईच्छेवर ही मायिक धारणा चालते. रोज मायिक कार्यात असणारा मी मिथ्या आहे. तो खोटाही नाही अन् खराही नाही. हा मध्येच कार्यकारणी असतो. तरीही तो अहंकारात सापडतो व फजित पावतो. त्यासाठी खरा मीचा शोध घ्यावा लागतो. तोही कार्यकारणीच असतो. तो अध्यात्म तत्वाने स्फुरतो. पण त्यासही अहंकार होतो. ह्या अध्यात्म तत्त्वातला मी सुद्धा देहापलीकडे आहे. म्हणून येथेही गर्व होता कामा नये. कारण ही अनात्मी विद्या कधीतरी शब्दचोरी करते व साधकाला फसवते. कारण मायेत राहून त्यातून अलिप्त राहणे सोपे नाही. याकरिता खऱ्या मीची प्रचिती आली तरीही तो ईश्वर आहे हे विसरु नये व आपण लिनता व निरहंकारात राहणेच बरे. ती अनूभुती सद्गुरुचिच समजून त्यानांच समर्पित करून आपण दास्यत्व पत्करावे.

मी म्हणवणारा आत्मा स्वयंसिद्ध आहे. माझी जाणीव करणारा मिच आहे. मला जाणता असा कोणी नसून जाणता जाणिवेत येणारा मिच आहे. मी ईच्छाशक्तीने येतो व आहे तोच राहतो. माझी धडामोड होत नसून मी स्वयंभु साकार असतो व आहे. घडामोड ही देह धारणेची होत असते. मी देहात असून त्यातून वेगळाच उरतो. मी पणाची जाणिव देहाला जीवामुळे होते. जीव हा माझ्या आत्म्याचा अंश आहे. संचिताप्रमाणे त्याला प्रेरणा देऊन माझ्या मिची जाणिव करून देतो.

याकरिता मागील संचित बलवान हवे. संचिताने प्रेरणा होते व चित्ताला चेतना मिळून चैतन्य खुलते. बरे असो, आत्मारामाची वाणी त्यालाच समर्पित करते.

आपली

भक्त्र बेबीनाथ माया

१८२) जीव हा एकदेशी व्यापक आहे. योनीप्रमाणे धर्म गुण.
१८३) स्फूर्तीरुप हे ब्रह्म आहे. अजन्म निश्चल हे स्थान.
१८४) संताने ईश्वर साकार होतो, धरी तसे अवतार.
१८५) सत्यासाठी-जीव गेला जरी घेऊ नये माघार.
१८६) शिलावंत प्राणी कदा न दडती, अमर सुकिर्ती यांची होय.
१८७) बाह्यात्कारी प्रेम उपयोगी नाही शुध्द हवे अंतरंग.
१८८) प्रेमळ मनुष्य ठक न राहे राखी हा नितीचा विचार.
१८९) गरिबांचे काळ बनू नये ठका सवे बना महाठक.
१९०) चोरावरी मोर ठोकल्याविणा शोभत न पदवी ते शूर.
१९१) गर्वताठा हा टिकत नाही, शेरा भेटत सव्वाशेर.
१९२) काडीसाठी माडी जाळू नये करावा हा खोल विचार.
१९३) असंकुचितपणा उपयोगी नाही, सरळ बना हे दानशूर.
१९४) ईश्वरी ओळख ऐशी धरा सर्वात्मा सर्वव्यापी देव.
१९५) संत दर्शने तिर्थे, संत खरे जगा देव.
१९६) मन निर्मळो असल्याशिवाय मिथ्या जप तप व्रत दान.
१९७) सतीचे व्रत ढळत नाही, गेला निघून जरी प्राण.
१९८) सतीचे हृदय निष्कपटी असते, तारक अवघ्या जगा होय.
१९९) सतीला देवी उपमा आहे, जिला लागले ब्रह्मभान.
२००) आत्म्याला शिवलिंग नाम आहे, तोची आत्मा असे राम.
२०१) मनुष्य सुशिक्षित बनल्याशिवाय मनी येती न सुविचार.
२०२) जगात श्रीमंत तोची खरा मन ज्याचे असे थोर.
२०३) शरणागतासी मरण देणे थोराचे नाही हे गा काम.
२०४) संतांना ईश्वर सद्गुरु आहे, सद्गुरुला ईश्वर परब्रह्म, परब्रह्म क्वचित साकार होते.
२०५) थट्टेने थट्टा वाढत जाते, थट्टेने न लागो बट्टा. विनोदी स्वभाव ऐसा हवा, जेणे बने जग मित्र.
२०६) ज्ञानापेक्षा कृतीला महत्व अधिक आहे, कृतीने मोठेपणा दिसून येतो.
२०७) ईश्वरी प्रणीत वाक्य मिथ्य ठरत नाही. अनुभव खात्रीनेच येत जातो.
२०८) मनाचे सिध्दांत फोल ठरतात. ईश्वरी सिध्दांत फोल ठरत नाही.
२०९) वादाने मोठेपण येत नाही. भक्तीने वाढे मोठेपण.
२१०) वादापेक्षा नम्रता बरी. सहनशिलता तारक होय.
२११) आत्म साक्षात्कार हेची ईश्वरी दर्शन ओळखावे स्वसरुप.
२१२) हेकेखोर मनुष्य जगाला आवडत नाही. बनू नये उतावीळ. शांतता एक बडी चीज आहे.
२१३) ईश्वर मोठेपण देत असतो. परंतु घेणाऱ्याला तो घेता आला पाहिजे व मोठेपणा राखता आला पाहिजे.
२१४) अन्नदात्यावर उलटू नये. करावे खाल्ल्याचे चीज.
२१५) लाभ हानी कळून येत नाही, प्रारब्धाच्या गती हजार, परंतु मनुष्याने सोडू नये आपूला विचार.
२१६) दूर्व्यसनी मनुष्य संकटात पडतो. इथल्या इथे आहे झडती यासाठी सत्संगे सुधारा कर्मगती.
२१७) पोरचेष्टा की माकडचेष्टा लावू नये. भल्या बळे बट्टा करू नये उगा कुणाचीच थट्टा.
२१८) घरचा दिवा बाहेरचा बुवा यातच ओळखा गह्य सारे बुडू नका कदा कोणी अविचारे.
२१९) मन हे पापी, डोळे हे पापी असे जाण बुध्दी सोडू नका अजुनी आपुली शुध्द.
२२०) जन्मदात्याचे जोडे खावे, खाऊ नये जोडे इतरांचे, अजुनीया सार्थक जाणावे जन्माचे.

२२१) मानपान सर्व हवा परंतु बनु नका बळे बुवा. बुवा बनुनी भामटेगिरीने पळवू नका बारे आवा.
२२२) दादागिरी ऐशी करा जग थोपटील जेणे पाठ. नाही तरी उगा बनू नका ताठ.
२२३) मन राजी तर बायको ही पाजी, परड्यातील नव्हे ही भाजी, अजूनही सावध रहावे बुवाजी.
२२४) देव पिसा तर भक्त पिसा उकळी फुटे प्रेमाची, फुटेना जोडी कदा बोधाची.
२२५) औट पीठ जीवाचे माहेरघर आहे. विश्व हे साडेतीन मात्रा ओळख धरी रे आपुली गुरुपुत्रा.
२२६) एक मरे एक उरे राहे कायम विस्तार. मूळ हे असे निर्गुण निर्विकार.
२२७) स्थूल, सुक्ष्म, कारण महाकारण देहाच्या अवस्था. ह्या चार जाणिवेच्या पलीकडे निर्गुण निर्विकार.
२२८) आपुला मान आपण राखा, इतर राखील हा कोण, सोडू नका तयासाठी मूळ भान.
२२९) देह नाशिवंत, सर्व कळे परि सुटेना अभिमान, स्वार्थासाठी प्राणी सोडीती भान.
२३०) स्फूर्ती आणि मन कळल्याशिवाय होईना पुढील जाणीव, सद्‌गुरुने कळे ज्याचा तया ठाव.
२३१) असंताचे संत बनुगा शक्ती बनती, संताचे बनती ना असंत संताचा कैवारी सदा भगवंत.
२३२) माय बापाशी जे शिणवती पोटी उपजले जंत. होईल बरवा ऐशांचा अंत.
२३३) मन मनाच्या अधिन असते. पवित्र राखा पहिले मन, तरीच चुकेल भवाचे बंधन.
२३४) मानव प्रेमाने कठोर बनतो. नाडी प्रत्येका हा स्वार्थ. स्वार्थामुळे बुडे अवघा परमार्थ.
२३५) सृष्टीसौंदर्य हे मनावर अवलंबून असते. पहिला जन्म असे मनाचा कर्ता मूळ वेगळा असे हा मनाचा.
२३६) मानवी विकार जरी त्या भासती दडत न ईश्वरी अवतार. अधिष्ठाने उचली पृथ्वीचा भार.
२३७) दांभिक भक्ती उपयोगी नाही. तेणे ईश्वर होय दूर. सांडा हा लौकिक मायेचा दूर.
२३८) भ्याड जिणे हे उपयोगी नाही, शूरत्व हे मरण बरे. गातील जन जेणे किर्ती सारे.
२३९) ज्ञान हे विज्ञानाचे शास्त्र आहे. विज्ञाने हरपते अज्ञान. सद्‌गुरुने होय स्थिर पूर्ण भान.
२४०) मन सुसंस्कृत बनल्याशिवाय घडत न हाती पुण्य कर्म. मनाच्या अधोगतीस पाप नाम.
२४१) देव तारी तया कोण मारी. हवा परी जातीवंत, कलीयुगी विरळे ऐसे संत.
२४२) मन पापी तर बुध्दीही पापी, करा पापाचा नाश. गुरुविण ना हरे भवपाश.
२४३) चोरा रात्र हवी असते करावया घरफ़ोडी. हरिभक्ता बहु जनाची गोडी.
२४४) जातीसाठी खावी माती, अस्सल बना जातीवंत, जातीवंत ओळखावा जातीवंत।।
२४५) प्रेमळांचा देव नादी आहे। पडेना तयाविण चैन. भक्तासाठी धाव घेई भगवंत।।
२४६) देव मरे भक्त मरे परब्रह्म एक उरे । जाणिवेची येथे कल्पना सरे ।।
२४७) देणारे दाता भेटल्यावर पडत न उणे कदापी। दाता असावा दानशूर पाही।।
२४८) अमर कुणाला म्हणावे जया लागले ब्रह्मभान। ऐशांचे सर्वव्यापी अधिष्ठान।।
२४९) कर्तव्यहीन मनुष्याला ठाव कोठेच मिळत नाही। मनुष्य सदा उद्योगी असावा।।
२५०) जगात हसे घरात पिसे अनीतीने घर सर्व नासे। लबाडाला टोनपा बरोबर ठसे ।।
२५१) बायको पुढे म्याँव बाहेर बाजीराव उतरे केव्हा तरी भाव जैशाला तैसी शिक्षा देई देव।।
२५२) कृती ही एक महत्त्वाची घटना आहे, कृतीने भूमिका बदलत जाते.
२५३) विषयानंद म्हणजे विदेही स्थिती नव्हे. विदेहात ब्रह्माची प्रचिती.
२५४) अवतार म्हणजे मनुष्य नव्हे, ईश्वराचे प्रत्यक्ष भान.
२५५) जीव म्हणजे आत्मा नव्हे, जीव असे चैतन्य बीज.
२५६) जिवात आत्म्याचे अधिष्ठान असते. आत्मा असे ज्ञानरुप.
२५७) मनुष्य कर्माने पिडलाम्हणजे त्याला वर काढणारा कोणी भेटत नाही. उलट लोक त्याची टिंगल करीत असतात
२५८) प्रसंग हे सर्वावर येत असतात. आपणावरून इतरांची परिक्षा करावी.

२५९) मानवाला वर काढणारा सद्‌गुरुशिवाय दुसरा कुणिच नाही.
२६०) सद्‌गुरु हा मोक्ष दाणी आहे। सद्‌गुरु हा दिनांचा वाली होतो.
२६१) मनाला तळमळ लागली म्हणजे आपोआप सद्‌गुरुची भेट होते.
२६२) आपण नसतो तर जग आपणाला दिसले नसते.
२६३) आंधळा नसता तर आंधळेपण कुणाला कळले असते.
२६४) वंश वाढ म्हणजे एक म्हातारपणाला टेका आहे.
२६५) निपुत्रीकपणा मनुष्याला रंजीस आणतो. असून नसून जिणे सारखेच असते.
२६६) मनाला पाप आठवत नाही असा भूमंडळी कोणीच नाही.
२६७) दुसऱ्याची टीका करण्यास मनुष्यास गंमत वाटते. आपली टिका केली म्हणजे राग मात्र भयंकर येतो.
२६८) आयुष्याला मर्यादा नसते. पापपुण्यानुसार घडामोडी घडतात.
२६९) दुबळे बनुन भागत नाही, ठोकावी चोरावर मोर तरीच जगात निभाव लागेल.
२७०) चिडका स्वभाव समजात उपयोगी नाही.
२७१) मनुष्य जातीने शूर असला म्हणजे वेळ पडली तर वाटेल ते करू शकतो.
२७२) एखाद्यावर उगाच कडक टिका करणे हे थोर पुरुषाला शोभत नाही. यामुळे उलट कमीपणा मात्र येतो.
२७३) ऐपतीशिवाय कोणतीही गोष्ट बोलू नये, ऐपती शिवाय कार्य हाती घेऊ नये.
२७४) ऐपतीप्रमाणे वागल्याशिवाय मनुष्याचा मान राहतच नाही.
२७५) शेतकी सकळांचे मुख्य जीवन आहे. प्रथम हाच प्रश्न सोडवला पाहिजे.
२७६) जगात मोठेपणा हवा असेल तर स्वावलंबी पूर्ण बनावे.
२७७) परोपकारी जीवन बहुमोल ठरते. किर्तीस बहू पात्र होते.
२७८) जन्मास आलेला प्राणी मेल्याशिवाय राहत नाही, केव्हा तरी मृत्यूशी टक्कर द्यावी लागते.
२७९) ठायीच पिळून बसणे हे मनुष्यपणाला शोभत नाही. काही तरी कर्तव्य हाती घडावयास हवे.
२८०) शिक्षक म्हणजे एक समाजाचा सुधारक आहे.
२८१) पुढारी म्हणजे एक राष्ट्राचा कैवारी आहे.
२८२) नेता म्हणजे एक जगाचा वारीसदारआहे.
२८३) सद्‌गुरु म्हणजे एक जगाचा मोक्षदाता आहे.
२८४) ईश्वर म्हणजे एक जगाचा सुत्रधारी आहे.
२८५) निराधारी मनुष्य असल्यावर ते लोक त्याला बोचीत असतात. वेळ पडली तर आरोपी ठरवतात.
२८६) चोरी शिंदळकी आणि चहाडी यातून जो अलिप्त आहे अशाला जगात कोठेच भय नाही.
२८७) पोटाची लाज धरणे बरे नाही, वेळ पडली तर पोटासाठी वाटेल ते करावे लागते.
२८८) निकामी मनुष्य कुणाला म्हणावे, ज्या अंगी भरला आळस. आळसाने आयुष्याची थोर हानी आहे.
२८९) वेव्हारात चोख बोलणे ठोक. ऐसाच मनुष्य वर निघू शकतो.
२९०) कन्यादान करणे महापुण्य आहे, कन्येचा विक्रय जो करतो यासारखा महापातकी कुणी नाही.
२९१) आत्मविश्वास हे थोर वैभव आहे, उतरती कळा कधी आणीत नाही.
२९२) टिकेला पात्र मनुष्य केव्हा होतो, जेव्हा त्याची निती बिघडते.
२९३) वेश्या व्यवसाय पत्करण्यापेक्षा उघड माथ्याने पुनर्विवाह करणे बरा.
२९४) शिंदळीचे नाक नकटेच रहाते। जिने सोडीली अब्रुलाज अंगावरी येतो विषयानंदी माज.
२९५) अन्नाला माजुरी बनू नये, भजून खावे सदा अन्न. तेव्हांच भरपूर देतो भगवान.
२९६) देह आपणाला विसरला तरी आपण देहाला विसरू नये, नरजन्माची ओळख धरावी.
२९७) त्याग, भोग आणि वैराग्य प्रसंगाप्रमाणे योग्य हवे. तरीच मनुष्याचा निभाव लागू शकतो.

२९८) गणिमीकावा पत्करल्याशिवाय शत्रूचा नाश होणे शक्य नाही. परंतु निती सोडू नये.

२९९) भल्याचे दास्यत्व पत्करावे. परंतु शिंदळ श्रीमंती बरी नव्हे.

३००) जगरुढीत वाटेल त्या गोष्टी घडत असतात. प्रसंगाप्रमाणे वागल्याशिवाय निभाव लागतच नाही.

३०१) नाकापेक्षा मोती जड नसावा, म्हणजे बायकोस वागुन घेता आले पाहिजे. तरीच लोकात धन्यता मिळू शकते.

३०२) रोगी रोग्याला बरा करित नाही. रोग्याला डॉक्टरच हवा. त्याचप्रमाणे मनुष्याला मनुष्य उध्दरीत नाही, मनुष्याला सद्‌गुरुच हवा.

३०३) वाचाळ मनुष्य केव्हा काय बोलेल याचा नेमच नसतो. म्हणून भल्याने नेहमी त्याच्या पासून दोन पावले दूर असावे.

३०४) दया क्षमा आणि शांती रसवंती ह्या संत पदाला अत्यंत शोभा आणतात. जातीवंत संत दडतच नाही.

३०५) भ्याले म्हणजे सगळेच लोक भिती घालीत असतात. भ्याडपणा उपयोगी नाही. भ्याडपणाने मनुष्य मागासला जातो.

३०६) कान भरवून घेण्यापेक्षा प्रत्यक्ष पहाणे बरे. म्हणजे पुढील आपत्ती टळते.

३०७) सज्जनापेक्षा दुर्जन बरा, जो गरिबांची वेळ जाणतो. ऐशा वेळी दुर्जनासच सज्जन म्हणावयास पाहिजे.

३०८) मनाला वाव दिल्याशिवाय मनाचा पांग फिटत नाही. परंतु मनावर ताबा राखता आला पाहिजे.

३०९) अति लाड करणे बरे नाही. यामुळे मुले नेभळट बनतात. यासाठी पालकांनी दाब ठेवला पाहिजे, म्हणजे मुले सावधपणाने वागतात.

३१०) पुराणातली वांगी पुराणात राहतात. भटजी करिती मांसाहार कलीयुगी म्हणविती आम्ही ब्राह्मण थोर.

३११) एकासाठी दहा मरा, पंरतु देशाचे हित करा. जातीभेद यासाठी विसरा, तरीच टिकेल धर्म खरा.

३१२) कल हीन मनुष्य सौभाग्याला शोभा देत नाही, मुळचाच शहाणा असावा लागतो. तेव्हाच गृहलक्ष्मीला सौख्य खरे लाभते.

३१३) परिस्थिती अनुकूल असल्याशिवाय कर्तव्य कोणतेही साधत नाही. कर्तव्यात सदा विचाराने वागा.

३१४) मनुष्य निश्चयी बनल्याशिवाय आत्मविश्वास हा वाढत नाही. कोणत्याही गोष्टीविषयी निश्चय दृढ हवा.

३१५) ज्ञानी मनुष्य हा अडून बसत नाही. आपण तरून हा इंतराला वर काढीत असतो.

३१६) दिलेले दान परत घेणे हे महामुर्खाचे लक्षण होय. यामुळे लोकांत कमीपणा येतो.

३१७) कसोटीने सोन्याची परीक्षा ठरते. कर्तव्याने मनुष्याचा मोठेपणा कळतो.

३१८) ज्ञान हे पढून होत नाही, तर ज्ञानाचा अनुभव यावयास लागतो. स्वानुभवी ज्ञान योग्य ठरते.

३१९) विद्येचा ज्याला अर्थ कळतो खरा म्हणावा विद्यार्थी. खरे विद्यार्थी थोडेच बनतात.

३२०) शिक्षण देण्याचे ज्याला ज्ञान आहे ऐशाला म्हणावे शिक्षक. खरे शिक्षक थोडेच असतात.

३२१) ब्रह्मज्ञान देण्याची ज्याअंगी शक्ती आहे, ऐशाला म्हणावे सद्‌गुरु. परंतु खरे सद्‌गुरु थोडेच असतात.

३२२) राष्ट्राविषयी जो खरे धोरण बांधितो ऐशाला म्हणावे पुढारी. परंतु खरे पुढारी थोडेच असतात.

३२३) वेळेप्रमाणे जो जगाचे धोरण बांधतो ऐशाला म्हणावे खरा नेता. खरे नेते थोडेच असतात.

३२४) जगाचे सुत्र जो योग्य चालवू शकतो ऐशाला म्हणावे ईश्वर. परंतु खरा अवतार क्वचितच भेटतो.

३२५) अधोगतीला हे जग पोहचवणे भल्या सत्पुरुषाचे हे काम नव्हे. पंथभेद उगा माजवू नये.

३२६) किमतीने घोडा दाणा खातो यासाठी अक्कल गमावू नये. अक्कलेने मोठेपणा वाढतो.

३२७) प्रत्यक्षता अंगी असल्याशिवाय नये ठरविता अवतार. ढोंगी लोकांपासून सावध रहा.

३२८) परमार्थ म्हणजे पोरखेळ नाही. यासाठी हवा सत्संग. सत्संगाशिवाय परमार्थाचे गुह्य कळत नाही.

३२९) मन रमले तर रमू द्या, देहाला बाटवून घेऊ नका. गुरुपुत्रच हे वर्म जाणू शकतो.

३३०) सोन्याचे केस तोंडाला आणिती फेस. सुंदरपणाला भुलू नका, आवरून धरा लगाम.

३३१) दुसऱ्याचा जीव वाचविण्याकरिता आपला जीव धोक्यात घातला तरी हरकत नाही. यातून खऱ्याला परमेश्वर तारू शकतो.

३३२) ज्याप्रमाणे भ्रमर पंकज कमळाच्या सुवासाला भुलून पडला म्हणजे तेथून निघण्याचे त्याला सुचत नाही व कमळ फुल मिटले म्हणजे यातच तो अडकून मरतो. त्याचप्रमाणे विषयी मग्न झालेला मनुष्य एकदा मोहजाळात अडकला म्हणजे यातून निघणे कठीण असते.

३३३) मधाच्या गोडीला भुलून माशी ज्याप्रमाणे आनंद सेवित असते. एकदा चिकटून बसली म्हणजे तिला सोडावेसे वाटत नाही. त्याचप्रमाणे ईश्वरी भजनात दंग झालेले सज्जन लोक स्वानंद सेवित असतात.

३३४) परस्त्री घातकी जिणे व्यर्थ आहे. यापेक्षा मरण बरे. परस्त्रीयेची हानी कदापी करू नये.

३३५) पतिव्रतेविषयी जो मनी पापी वासना धरतो यासारखा चांडाळ जगात दुसरा कुणी नाही. केलेल्या कर्माची फळे हा तत्काळ भोगीत असतो.

३३६) देवाने दिले तर घेता आले पाहिजे आणि त्याचप्रमाणे ते लोकाला देता आले पाहिजे तरीच जन्माला येऊन धन्यता खरी मिळू शकते.

३३७) लग्नाचा मंडप उभारिला जावई दादा पळुनी गेला. पैशामुळे दोघांच्या तक्रारी कलीयुगात नकल ही भारी.

३३८) श्रीमंतीने मान वाटे, एकदा तरी गा अनर्थ उडे. अनितीने हे मरण घडे म्हणून सावध राहा.

३३९) अपमान सहन करून गरिब तरे, नितीने संपती शेवटी घडे, सहज ईश्वर मग जोडे.

३४०) पणाला पण लावू नये, पणाने पण जिंका. परंतु प्रत्येक गोष्टीत सावधान, तरीच सुकीर्तीस पात्र व्हाल.

३४१) गरीबांचा न्याय करता आला पाहिज तरीच पदवी शोभे. न्यायाधीश श्रीमंतांचा लावूनी घेऊ नये पाश.

३४२) घेणार हे पुष्कळ भेटती देणार भेटती बहू थोडे. परोपकार बहू थोड्या हाती घडे.

३४३) काळाचा अंत होत नाही राहे अक्षयी हा काळ  परंतु जाणता आली पाहिजे वेळ.

३४४) मनाचे देव पुष्कळ भेटती. पढुनी शास्त्र पुराण सद्गुरुवीण मिथ्या परमार्थ जाण.

३४५) कोणतीही गोष्ट धसास लावणे बरे नाही. यावेळी धरावे शहाणपण. तेव्हाच हरतील प्रसंग कठीण.

३४६) योग्य प्रसंग बघुन पदरात मापे घाला, रहावे सावधान अजून तववरी असावे शत्रुशी नमून.

३४७) देव सगळ्यांलाच सारखे देत असतो. परंतु स्वार्थामुळे मनुष्याची बुध्दी फिरते. यामुळे कठिण आपत्तीत मनुष्य सापडतो. त्याला वर निघणे अतिशय जड जाते.

३४८) मनुष्याने दिलेले रिते पडते आणि देवाने दिलेले भरत असते. देवाने दिलेले सरतच नाही.

३४९) दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिने म्हणजे हातपाय असून कर्महीन नाही का? अजून आळशी बनू नका.

३५०) ज्याप्रमाणे आंब्यात जाती आहेत, त्याप्रमाणे मनुष्यातही जाती आहेत. ज्याच्या त्याच्या कर्तबगारीवरून उच्च-नीच पणा ठरविता येतो.

३५१) ज्याचे ज्ञान असे नकली म्हणावे ऐशाला बेअकली नकल्याला लोक भेटती. नकली शेवटी परमार्थी वाट चुकली

३५२) लोचट कुत्र्याला किती जरी हाणले तरी ते पुन्हा दाराच्या तोंडाशी बसतं.त्याचप्रमाणे विषयी मग्न झालेल्या पुरुषाची परनारीमुळे फजिती होते. यामुळे लोकात हास्य पिकून थट्टेला आरंभ होतो.

३५३) तपाने रिध्दीसिध्दी प्राप्त होतात. तपाने ध्यान साधत जाते आणि भक्तीप्रमाणे ईश्वराजवळ येत जातो. यासाठी ज्याला जे पाहिजे असेल त्यानी ते विचाराने मिळवून घ्यावे.

३५४) सर्वगुणसंपन्न जरी मनुष्य असला तरी स्वार्थ उपजला म्हणजे त्याची बुध्दी फिरते. स्वार्थामुळे त्याला कुणाचीच ओळख रहात नाही.

३५५) म्हातारपणाला तरुणपणाचा माज येतो. म्हणजे काय काम विषयी जो मग्न आहे.

३५६) नपुंसकाला जर पोरे झाली असती तर पुरुषाला का न व्हावी

३५७) ईश्वरी हृदय कळल्यावर मनुष्य विकल्पात बुडत नाही. जाणीव धरूनच वागत असतो.